पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची आज विशेष व्यवस्थापन परिषद सभा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्यावरील आरोप उच्च न्यायलयाने फेटाळले आहेत. मात्र, विद्यापीठाने त्यांचे पेन्शन व इतर लाभ थांबवले आहेत. यावरून विद्यापीठ प्रशासन व व्यवस्थापन परिषद समोरासमोर आले आहेत. यासंदर्भात बुधवारी (दि.१८) व्यवस्थापन परिषदेची विशेष सभा होत आहे. डॉ. मुळे यांच्यावरील आरोपपत्र फेटाळून लावताना चार आठवड्यात त्यांना सेवानिवृत्ती वेतनासह अन्य लाभ द्यावेत, असे आदेश न्यायालयाने विद्यापीठ प्रशासनाला दिले. तरीही विद्यापीठ प्रशासन चालढकल करत असल्याचा सवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ विकास आघाडीच्या सदस्यांनी प्रशासनाला केला. व्यवस्थापन परिषदेच्या अधिकाराच्या अखत्यारीत मतदान घेऊन प्रलंबित विषय निकाली काढावा, अशी भूमिका विद्यापीठ विकास आघाडीने घेतली आहे. व्यवस्थापन परिषदेची विशेष बैठक बुधवारी होणार आहे. यात डॉ. मुळे यांना सेवानिवृत्त वेतनासह अन्य लाभ देण्यासंबंधी एकमताने निर्णय झाल्यास तर मतदान होण्याची शक्यता आहे.

1 8 OCT 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिनियम-परिनियमांची पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून खुलासा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ नुसार तयार करण्यात आलेल्या सर्व परिनियमांची एकत्रित पुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ सह यापूर्वीचे विद्यापीठ कायदे, सर्वसाधारण परिनियम हेही विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, असा खुलासा शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आला आहे.

नियमावलीची पुस्तिका उपलब्ध नसल्याचा आरोप अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी पत्रकारी परिषदेमध्ये रविवारी केला होता.

प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, विद्यापीठ अभ्यासक्रमासंदर्भातील नियमावली ही संबंधित अभ्यासक्रमाचा भाग असल्याने व त्यात वेळोवेळी बदल होतात. तसेच, सामान्य प्रशासन, महाविद्यालयीन कामकाज, परीक्षा आणि वित्तविषयक वारंवार संदर्भांसाठी वापरण्यात येणाऱ्या तरतुदी, तसेच लेखासंहिता यांच्या स्वतंत्र पुस्तिका संबंधित विभागांमार्फत तयार करून वापरल्या जातात. मागणीनुसार त्या उपलब्ध करून दिल्या जातात.

विद्यापीठाच्या कॅन्टीनमध्ये ठेवावयाच्या पदार्थांसंदर्भात उपाहारगृह समिती कॅन्टीनना वेळोवेळी भेटी देऊन खातरजमा करत असते. त्यांच्याशी करण्यात आलेला करार आणि त्यांना पुरवण्यात आलेले दरपत्रक यामध्येही त्या पदार्थांव्यतिरिक्त अन्य पदार्थ विद्यापीठाच्या मान्यतेखेरीज ठेवता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. असे पदार्थ विक्रीस ठेवल्याचे आढळल्यास विद्यापीठ प्रशासन त्यांच्यावर कठोर कारवाई करेल, असेही विद्यापीठ प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

लोकमत

# विद्यापीठात उद्या पुस्तक प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे उद्या, गुरुवारी 'सावित्रीबाई फुले : हर लाईफ, हर रिलेशनशिप, हर लिगसी' पुस्तकाचे प्रकाशन व त्यावर चर्चासत्र होईल. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. यशवंत थोरात, अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, लेखिका रिटा गुप्ता चर्चासत्रात सहभागी होणार आहेत.

18 OCT 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनाने माणूस समृद्ध होतो : प्रा. विनोद कांबळे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नव्या पिढीने वाचन आणि अनुभवाची सांगड घालून स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे. वाचन संस्कृती वाढविणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन म. ह. शिंदे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विनोद कांबळे यांनी केले.

मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रुती जोशी होत्या.

याप्रसंगी ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्तविक केले. प्रा. डॉ. स्वप्नील बुचडे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी आभार मानले.

18 OCT 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फौंड्री टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाला मान्यता

- शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापनच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ६१ विषय विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये रसायनशास्त्र अधिविभागात फौंड्री टेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच हंगामी प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. यासह विषयपत्रिकेवरील आणि ऐनवेळच्या ६१ विषयांवर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर सचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी समिती गठीत केली आहे. सार्वजनिक विद्यापीठ कायद्यांतर्गत ७२ (२) कलमाची अंमलबजावणीसाठी समिती गठीत केली. जातीवर आधारीत भेदभाव प्रतिबंधक समितीसाठी मुदतवाढ देण्यात आली. चेंजिंग स्टाफच्या अहवालाला मंजुरी दिली. महनीय व्यक्तींच्या फोटो लावण्यासंदर्भातील अहवालाला मान्यता देण्यात आली. सांगली आणि सातारा जिल्ह्यातील उपकेंद्रासाठी दोन समित्या गठीत केल्या. लोणेरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या उपकेंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. महापालिकेने दिलेल्या पाण्याच्या बिलासंदर्भात अधिकारी, पालकमंत्र्यांशी चर्चा करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठाच्या मुदतीत अभ्यासक्रम पूर्ण न केलेल्या एक हजार विद्यार्थ्यांना आणखी दोन वर्षाची मुदतवाढ देण्यात आली.

18 OCT 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शाही दसरा कोल्हापूर महोत्सवात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, केरळ, आसाम येथील लोकनृत्ये सादर केली. (छाया : नाज ट्रेनर)

# लोकनृत्यांच्या कलाविष्कारांना रसिकांची दाद

**शाही दसरा कोल्हापूर महोत्सव**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवदुर्गा लोकनृत्योत्सवाच्या माध्यमातून लोककलांवर आधारित शाही दसरा कोल्हापूर महोत्सवात लोकनृत्यांच्या आविष्काराला रसिकांनी दाद दिली. दसरा चौक येथे आयोजित या कार्यक्रमात गोवा, केरळ, महाराष्ट्रातील लोकनृत्ये स्थानिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सादर केली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या युवा महोत्सवात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य सादर केली होती. यातील काही नृत्यांचा समावेश महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमात करण्यात आला. युवा महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या लोकवाद्यवृंद समूहाने केरळा नटनम नृत्य हे केरळचे वाद्यवृंद सादर केले. बिहू नृत्य, आसामचे लोकनृत्य व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजीच्या विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केला.

न्यू कॉलेजच्या कलाकारांनी वाघ्या मुरळी नृत्य, कॉमर्स कॉलेज कमसाले नृत्य, कर्नाटक, यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूरच्या विद्यार्थ्यांनी रायबेंशे नृत्य, पश्चिम बंगालची लोककला सादर केली. श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथील विद्यार्थिनींनी जोगवा नृत्य.

विश्वासराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय, शिराळा यांनी गोव्याचे दिवली नृत्य, तर शिवाजी विद्यापीठ सांस्कृतिक संघ कोल्हापूरच्या रणरागिणींवर आधारित स्त्रीशक्ती नृत्य सादर करून रसिकांची मने जिंकली.

जनसंपर्क कक्ष
18 OCT 2023 क्रांतीसिंह
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक शास्त्रज्ञांमध्ये विद्यापीठातील १३ प्राध्यापक

कोल्हापूर(प्रतिनिधी):-जगातील आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञ संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठातील १३ प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे. त्यातील १० जणांना सलग दुसऱ्यावर्षी पुर्नमूल्यांकन मिळाले आहे. त्यात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश आहे. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने यावर्षीच्या संशोधकांची यादी जाहीर केली.

स्टॅनफोर्डने जगभरातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्याची दखल घेवून करिअर आणि एक वर्षातील कामगिरीवर आधारित दोन स्वतंत्र यादीमध्ये संशोधकांची नावे जाहीर केली आहेत. प्राध्यापकांचे संशोधन, शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधनपत्रिकेचा दर्जा, सायटेशन्स, आदी निकषांचा यादी जाहीर करताना विचार करण्यात आला. करिअर यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रा. केशव राजपुरे, ए. व्ही. राव, सी. एच. भोसले (भौतिकशास्त्र), जे. पी. जाधव, एस. पी. गोविंदवार (बायोकेमिस्ट्री) यांचा, तर एक वर्षातील कामगिरीच्या यादीत प्रा. पाटील, गोविंदवार, जाधव, राजपुरे (भौतिकशास्त्र) यांच्यासह प्रा. अण्णासाहेब मोहोळकर (भौतिकशास्त्र), के. एम. गरडकर, डॉ. तुकाराम डोंगळे, हेमराज एम. यादव, एस. ए. जाधव (नॅनोसायन्स), एस. व्ही. ओतारी (वायसी कॉलेज, कराड), शरद व्हनाळकर (कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी) यांचा समावेश आहे. या दोन्ही यादींमधील प्रा. पाटील, राजपुरे, राव, गोविंदवार, जाधव, यादव, मोहोळकर, ओतारी, गरडकर, डोंगळे यांनी सलग दुसऱ्यावर्षी क्रमवारीत पुर्नमूल्यांकन मिळविले आहे.

18 OCT

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे


# उभयचर संपण्याच्या मार्गावर!

मानवाचा इतिहास समजून घेताना मानवही अन्य प्राण्यांपैकी एक असल्याचे आपल्याला लक्षात येते. पुढे मानवाने बुद्धीचा वापर करून प्रगती करायला सुरुवात केली. स्वतःचे कष्ट कमी करण्यासाठी त्याने भौतिक साधनांची निर्मिती केली. ही साधने कार्यरत ठेवण्यासाठी ऊर्जेचा वापर करणे अपरिहार्य ठरले. ऊर्जेची निर्मिती करण्यासाठी, ऊर्जा उपलब्ध करून घेण्यासाठी ऊर्जा साधनांचा वापर सुरू झाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती करत मानवाने आजचे जग निर्माण केले. पूर्वी पृथ्वीवरील असंख्य जीवांपैकी एक असणारा मानव स्वतःला सर्वात प्रगत मानू लागला. या पृथ्वीचा स्वामी समजू लागला. मानवाच्या अस्तित्वावर कोणतेही संकट आले की त्यावर उत्तर शोधू लागला. कोरोना आल्यानंतरही मानवाने तातडीने संशोधन करून लस बनवली आणि कोरोनाचे संकट दूर केले. मात्र, या प्रगतीची वाट चोखाळताना निसर्गाचे अपरिमीत नुकसान केले.

ऊर्जा मिळवण्यासाठी इंधन म्हणून सर्वात अगोदर लाकडाचा वापर सुरू केला. लाकूड मिळवण्यासाठी सुरुवातीला निसर्गतः उपलब्ध होणारी वाळलेली लाकडे वापरली जात. ऊर्जेची वाढती गरज भागवण्यासाठी पुढे झाडांची कत्तल सुरू झाली. जंगले नष्ट करून लाकडे मिळवली जाऊ लागली. झाड असा जीव आहे की, मानव आणि इतर प्राण्यांनी श्वसनावाटे बाहेर टाकलेला कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेण्याचे कार्य करतो. मात्र, या झाडांचे प्रमाण घटू लागले आहे. दुसरीकडे त्यांना जाळून परत वातावरणात कार्बन डाय ऑक्साईडच सोडला जातो. एकीकडे लोकसंख्या वाढत असताना, ऊर्जेसाठी इंधन जाळत असताना, भौतिक सुखाची साधने वापरताना, वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड वाढत चालला, तर दुसरीकडे या कार्बन डाय ऑक्साईडला शोषून घेणारी झाडे मात्र कमी होत गेली. त्याचबरोबर मानवाने त्रासदायक ठरणाऱ्या अनेक वनस्पती नष्ट करून टाकण्याचा सपाटा लावला. यामध्ये प्रामुख्याने काटेरी वनस्पतींचा समावेश होतो. आज मोठ्या बाभळीची झाडेसुद्धा दिसत नाहीत.

मानवाला आणि इतर जीवांना आवश्यक घटक पुरवणाऱ्या हजारो वनस्पतींची लूट सुरू केली. नरक्याचे औषधी गुणधर्म आणि चंदनाचा सुगंधच त्यांचे शत्रू ठरले. आज या झाडांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. पाणी मुबलक प्रमाणात मिळावे यासाठी नद्यांचे प्रवाह अडवले. नद्यांचे पाणी ज्या भागातून यायचे, त्या भागातील जमिनीचा भूगोल बदलवला. शेतीसाठी जमीन मिळावी यासाठी जंगलाची कत्तल, नैसर्गिक संसाधनांना नष्ट करण्याचे सत्र सुरूच राहिले. परिणामी निसर्गातील जैवसाखळी खंडीत होत गेली. हवेचे प्रदूषणही वाढले. सर्वच नैसर्गिक संसाधनांचा मानवाने अविचारी वापर सुरू केला. यातून हवा, पाणी, जमीन या सर्वांचे प्रदूषण सुरू झाले. या सर्वांचा परिणाम सर्वात अगोदर जो झाला तो हवेच्या गुणवत्तेवर. त्यातून सुरू झाली ती तापमानवाढ, कोळसा आणि इंधन तेलाचा वापर सुरू झाला आणि पृथ्वीभोवती असणाऱ्या हवेच्या तापमानात, पर्यायाने जमिनीच्या आणि पाण्याच्या तापमानात वाढ होऊ लागली. निसर्गातील त्या-त्या घटकांमध्ये असणाऱ्या जैविक साखळीला त्यामुळे धोका निर्माण होत गेला. आज परिस्थिती इतकी गंभीर होत चालली आहे की, अनेक जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

जागतिक तापमानवाढ झाल्यामुळे जमिनीवरील असणारे बर्फाचे आवरण नष्ट होऊ लागले आहे. त्याचा परिणाम समुद्राची पातळी वाढण्यावर होत आहे. पाण्याचे तापमान वाढल्याने पाण्यामध्ये राहणारे जीवही धोक्यात आले आहेत. नुकताच 'नेचर' या जगप्रसिद्ध



नियतकालिकामध्ये एक संशोधन निबंध प्रसिद्ध झाला आहे. यामध्ये उभयचर प्राण्यांतील अनेक प्रजाती काही वर्षांत नष्ट होणार असल्याचे हा अहवाल सांगतो. उभयचर नष्ट होण्यामागे जागतिक तापमानवाढ हे कारण असल्याचे या शोधनिबंधामध्ये नमूद करण्यात आले आहे. खरे तर, केवळ हे एकच कारण आहे असे नाही. शेतीमध्ये वापरली जाणारी कीटकनाशके, तणनाशके, खते यामुळे जमीन जशी प्रदूषित होत आहे, तसेच पाणीही प्रदूषित होत आहे.

आज पृथ्वीवरील नेमकी सजीवांची संख्या संशोधकांनाही माहीत नाही. म्हणूनच आजही नव्या प्रजाती शोधल्या जात आहेत. त्याबाबतच्या बातम्याही येत असतात. त्यामुळे नेमक्या प्रजाती किती आहेत हे आजही ज्ञात नाहीत, हे खरेच आहे. त्यातही बदलत्या वातावरणास अनुकूल बदल करून घेऊन जनुकीय बदल घेऊन नवे प्राणीही तयार होत असतील. हे असले तरी आज अनेक जीव नष्ट होत आहेत, हे सत्य आहे. बालपणी पाहिलेली झाडेही आज दुर्मिळ झाली आहेत. त्यांच्या सहाय्याने जगणारे काही जीव दुसऱ्या झाडावर अधिवास शोधतात, मात्र काही जीवांना तेच झाड हवे असते. असे जीव नष्ट होतात. त्यातून अनेक किटकांच्या प्रजाती नष्ट होत आहेत.

मात्र, उभयचर प्राण्यांना असा पर्याय नसतो. त्यांना पाणी आणि जमीन या दोन्ही गोष्टी हव्या असतात. पाण्याचे तापमान त्यांच्या सहनीय मर्यादेपेक्षा जास्त वाढले तर त्यांना जगणे अवघड होते. बेडकासारखा प्राणी पावसाळ्यात शेतकऱ्यांचा मित्र म्हणून काम करतो. तो शेतातील अनेक किटकांचे भक्षण करून जगतो. पावसाळा संपला, पाणीसाठे दिसेनासे झाले की तो स्वतःला मातीमध्ये गाडून घेतो आणि निद्रावस्थेत राहतो. त्यांच्या अस्तित्वावर सर्वात मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रजातींना ना चांगली जमीन उपलब्ध होते ना पाणी. समुद्रापासून लोणारच्या सरोवरापर्यंत सर्वत्र मोठ्या प्रमाणात मायक्रोप्लास्टिकचे कण आढळतात. त्याचे अंश मानवी देहापासून सर्वच प्राण्यात आढळत आहेत. त्यातच तापमानात होणारे बदल उभयचरांना घातक असणाऱ्या बुरशीजन्य घटकांची मोठ्या प्रमाणात वाढ करतात. हे बुरशीजन्य घटक अचानक वाढले आणि तापमानात मोठ्या प्रमाणात बदल झाले की उभयचरांना तो अधिवास प्रतिकूल बनतो. अधिवासच धोक्यात आला की हे प्राणी त्या भागात राहू शकत नाहीत. अर्थातच, त्यांना नवा अधिवास शोधावा लागतो. त्यासाठी त्यांना स्थलांतर करावे लागते. स्थलांतर करताना अनेकदा ते भक्ष बनतात. त्यांची संख्या घटत जाते. यातून ४० टक्केपेक्षा जास्त प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

निसर्गाची रचना खूपच सुंदर आहे. निसर्गाने सर्व प्रजातींना जगण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. एका जीवाला दुसऱ्याचे अन्न बनवले आणि पृथ्वीवर सर्व प्रजाती समतोल प्रमाणात वाढाव्यात अशी संरचना केली. यापूर्वी हे संतुलन निसर्गात घडणाऱ्या घटनांमार्फत होत असे. आजवर सहा वेळा अशा प्रजाती घटल्याचे संशोधक सांगतात. यातील उल्कापातामुळे डायनॉसॉर नष्ट झाल्याचे सर्वसामान्यांना माहीत आहे. आता मात्र प्राण्यातील उभयचर घटकांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे आणि तेही मानवाच्या निसर्गातील अमानवी हस्तक्षेपामुळे. म्हणूनच ते चिंता वाढवणारे ठरते.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००